## प्रेस नोट

दिनांक ०४/११/२०२५

लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे, वय ५० वर्षे पद ग्राम पंचायत अधिकारी, खरबा, ता. मानवत, जि. परभणी रा. राहुल नगर, सुपर मार्केटच्या जवळ, परभणी यांनी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान १,०००/- रूपयांची मागणी करून लाच स्विकारले प्रकरणी अेसीबीच्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | ला.प्र.वि. परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे. मानवत गुरनं. ४३६/२०२५ कलम ७ भ्रप्रअधि. १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे २३:०० वा. |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता | रमेश रंगनाथराव मुळे, वय ५० वर्षे पद ग्राम पंचायत अधिकारी, खरबा, ता. मानवत जि.परभणी, रा. राहुल नगर, सुपर मार्केटच्या जवळ, परभणी. |
| लाच स्विकारली रक्कम | १,०००/- रूपये. |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार यांची पत्नीचा आजारा दरम्यान दि. २२/०२/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. त्याबाबत खरबा ग्रामपंचायत येथे नोंद करून ग्राम पंचायत अधिकारी रमेश मुळे यांच्याकडून दिनांक २३/१०/२०२५ रोजी मृत्युप्रमाणपत्र घेण्यात आले. त्यावेळी ग्राम पंचायत अधिकारी यांनी मृत्यु नोंद घेवून प्रमाणपत्र दिल्यामुळे ५००/- रू. ची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांना ५००/- रू. रक्कम दिली त्यानंतर दिनांक २८/१०/२०२५ रोजी ग्राम पंचायत अधिकारी रमेश मुळे यांनी तक्रारदार यांना फोन करून मृत्यू प्रमाणपत्र दिले म्हणून पुन्हा ५००/- रू ची मागणी केली. ग्राम पंचायत अधिकारी मुळे हे मागत असलेले ५००/- रू. ही लाच आहे. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०४/११/२०२५ रोजी ला.प्र.वि. परभणी युनिट येथे तक्रार अर्ज दिला.

दिनांक ०४/११/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय खरबा येथे लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे, ग्राम पंचायत अधिकारी यांनी तक्रारदार यांना १०००/- रू. लाचेची मागणी पंचा समक्ष केली.

दिनांक ०४/११/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक रमेश रंगनाथराव मुळे, पद ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय खरबा , ता. मानवत, जि. परभणी यांनी ग्रामपंचायत कार्यालय खरबा येथे पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून १,००० /- रू लाचेची रक्कम स्विकारली असून त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात असुन पो.स्टे. मानवत गु.र.नं. ४३६/२०२५ कलम ७ भ्रप्रअधि. १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, सहा.पोउपनि/चंद्रशेखर निलपत्रेवार, पोह/१३६६ आदमे, पोशि/१६८७ अतुल कदम, चापोशि/९२० अनिल नरवाडे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| तपास अधिकारी | श्रीमती मनिषा पवार, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी.** | |
| **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड :-** 9226484699. | |
| **पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी :-** 9870313157, 9272211064. | |
| दुरध्वनी क्रमांक :– 02452&220597 टोल फ्री क्रमांक:– 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| **9272111064** | |

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी